# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

website : http://www.dteau.org email : roaurangabad@dtemaharashtra.gov.in


जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१९/ १०६

दिनांक :- 14 MAR 2019

प्रति,

प्राचार्य,

शासकीय/अनुदानीत व विना अनुदानीत अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र/व्यवस्थापन शास्त्र/

वास्तुशास्त्र पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था

औरंगाबाद विभाग

**विषय**:-" लोकशाही निवडणूक व सुशासन" या विषयाच्या अनुषंगाने नवीन संशोधन हाती घेणे तसेच इतर अनुषंगिक नाविण्यपूर्ण उपक्रम राबविण्याबाबत दिनांक ५ जानेवारी, २०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. आयुक्त राज्य निवडणूक आयोग यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

**संदर्भ** :-१) मा. सहसचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, मुंबई यांचे पत्र क्र.रानिआ-२०१७/ प्र.क्र.०८/संशोधन कक्ष दि. १३/०२/२०१९

२) मा.संचालक तंत्रशिक्षण संचालनालय म. रा.,मुंबई यांचे पत्र क्र.१०/एनजीपी/संकीर्ण/२०१९ शा५००/२०१, दि.२५-०२-२०१९

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, संचालनालयाचे संदर्भीय पत्रानुसार "लोकशाही निवडणूक व सुशासन" या विषयाच्या अनुषंगाने नवीन संशोधन हाती घेणे तसेच इतर अनुषंगिक नाविण्यपूर्ण उपक्रम राबविण्याबाबत दिनांक ५ जानेवारी, २०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. आयुक्त राज्य निवडणूक आयोग यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीचे इतिवृत्त सोबत जोडले आहे.

आपल्या संस्थेतील अधिकारी/कर्मचारी व विद्यार्थ्यांचे निदर्शनास आणून दयावी व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सोबत: वरीलप्रमाणे.

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रत: या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना वेबसाईवर अपलोड करण्यासाठी.

RAM/dte and other sr office

४३३
२०.२.२०१९

राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ-२०१७/प्र.क्र ०८/संशोधन कक्ष
नवीन प्रशासकीय इमारत, १ ला मजला,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १३/०२/२०१९

प्रति,

१. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा. कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
३. मा. कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, रायगड
४. मा. कुलगुरु, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, रत्नागिरी
५. मा. कुलगुरु, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला
६. मा. कुलगुरु, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी
७. मा. कुलगुरु, वसंतराव नाईक मराठवाडा विद्यापीठ, परभणी
८. मा. कुलगुरु, महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपूर
९. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
१०. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

विषय :- "लोकशाही, निवडणूक व सुशासन" या विषयाच्या अनुषंगाने नवीन संशोधन हाती घेणे तसेच इतर अनुषंगिक नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याबाबत दिनांक ५ जानेवारी, २०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. आयुक्त, राज्य निवडणूक आयोग यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

महोदय,

"लोकशाही, निवडणूक व सुशासन" या विषयाच्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाकडून नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जात आहेत. याचाच भाग म्हणून मतदार नोंदणी व मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी विद्यापीठे, पॉलीटेक्नीक व आयटीआय संस्थांची महत्वाची भूमिका असल्याने त्यांना या प्रक्रियेमध्ये सहभागी करुन घेण्यासाठी अनेक उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

याच विषयावर मा. आयुक्त, राज्य निवडणूक आयोग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ५ जानेवारी, २०१९ रोजी Deemed University व कृषी विद्यापीठे यांच्या समवेत बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत १८ वर्षावरील मुला-मुलींचा मतदार यादीमध्ये समावेश करणे, "लोकशाही, निवडणूक व

कृ.मा.प...२/...



आ.क्र. ५२०
१६/२/१९

सुशासन" हे मॉड्युल अनिवार्य करणे, लोकशाही पंधरवडा साजरा करणे, स्थानिक स्वराज्य संस्थांना भेटी देणे, संशोधनाला चालना देणे व नवीन अभ्यासक्रम (Short Term/Long Term) सुरुं करणे या विषयांवर चर्चा करण्यात आली.

उपरोक्त बैठकीचे इतिवृत्त सोबत जोडून पाठवित आहे.

आपला,

( राजाराम झेंडे )
सहसचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

प्रत माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी :-

१. मा. सचिव, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई
२. मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत माहितीसाठी:-

१. मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे स्वीय सहायक
२. मा. सचिव, राज्य निवडणूक आयोग यांचे स्वीय सहायक
३. निवड नस्ती (संशोधन कक्ष, राज्य निवडणूक आयोग, मुंबई)

दि. ५ जानेवारी, २०१९ रोजी "लोकशाही, निवडणूक व सुशासन" या विषयाच्या अनुषंगाने नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणेबाबत आयोजित केलेल्या बैठकीचे इतिवृत्त.

वयाची १८ वर्षे पूर्ण झालेली मुलेमुली, प्रामुख्याने विद्यापीठे, पॉलिटेक्नीक, आयटीआय इत्यादी मध्ये शिक्षण घेत असल्याने या सर्व संस्थांनी वरील विषयावर पुढाकार घेणे आवश्यक असल्याने त्यांची एक बैठक दि. ५ जानेवारी, २०१९ रोजी सकाळी ११.०० वा. मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या बैठकीस उपस्थित अधिकाऱ्यांची यादी सोबत जोडली आहे.

२. बैठकीची सुरुवात करताना मा. राज्य निवडणूक आयुक्त यांनी खालील प्रस्तावना नमूद केली:-

i) मतदार नोंदणी व मतदानाची टक्केवारी वाढविण्यामध्ये विद्यापीठे, पॉलीटेक्नीक, आयटीआय इ. यांची अत्यंत महत्वाची भुमिका लक्षात घेता राज्य निवडणूक आयोग यांनी गेल्या २/३ वर्षापासून त्यांना या प्रक्रियेमध्ये सहभागी करुन घेण्यासाठी अनेक पाऊले उचलली आहेत.

ii) विद्यापीठे, पॉलीटेक्नीक, आयटीआय इ. खालील विषयावर महत्वाची भुमिका बजावू शकतात :-

अ) विद्यापीठ / महाविद्यालयांमध्ये प्रथम वर्षाच्या प्रवेश अर्जामध्ये १८ वर्षे पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांकडून "मी मतदार म्हणून नोंदणी करणार" या आशयाचे हमीपत्र घेण्याकरिता दुरुस्ती करणे.

आ) विद्यापीठ / महाविद्यालयांमध्ये प्रथम वर्षाच्या फाऊंडेशन कोर्समध्ये "लोकशाही, निवडणूक व सुशासन" हे मॉड्यूल अनिवार्य करणे.

इ) राज्यात दि. २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी दरम्यान लोकशाही पंधरवडा साजरा करणे.

ई) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजाच्या कार्यानुभवासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या स्थानिक स्वराज्य संस्थांना भेटी आयोजित करणे.

ज) स्थानिक स्वराज्य संस्थांसंदर्भातील लोकशाही, निवडणुका व सुशासन या अनुषंगाने विद्यापीठांकडून संशोधनाला चालना देणे, तसेच आवश्यकतेनुसार नवीन अभ्यासक्रम सुरु करणे (Short Term / Long Term) इ.

iii) सुरुवातीला शासकीय पारंपारीक, कृषी, वैद्यकीय, अभियांत्रिकी, मत्स्य व पशुवैद्यकीय विद्यापीठांबाबत पुढाकार घेण्यात आला असून शासनाच्या संबंधित प्रशासकीय विभागाने खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित केलेले आहेत :-

| अ. क्र. | विषय | विभागाचे नाव | शासन निर्णय क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|
| १ | नावनोंदणी | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | संकीर्ण-२०१६/प्र.क्र.६८३/१६,विशि-३, दि. १५ मे, २०१७ |
| | | कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग | संकीर्ण-१५१७/प्र.क्र.१८५/६-ओ, दि. ५ जून, २०१८ |
| | | कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग | मपवि-२०१७/प्र.क्र.३७/माफसू, दि. ५ मे, २०१७ |
| | | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१३५/१७/ शिक्षण-१, दि. २ जून, २०१७ |
| २ | स्थानिक स्वराज्य संस्थांना भेट देणे | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | संकीर्ण-२०१६/प्र.क्र.६८३/१६,विशि-३, दि. २७ जुलै, २०१८ |

शासनाच्या वरील आदेशान्वये बऱ्याचशा विद्यापीठांनी जरी काही पाऊले उचलली असली तरी अजूनही भरपूर काम करणे शिल्लक आहे. तसेच राज्यामध्ये असणाऱ्या डीम्ड् युनिव्हर्सिटी / खाजगी विद्यापीठे, तंत्रनिकेतन, आयटीआय यांनी अजूनही याबाबतची विशेष कार्यवाही केलेली दिसत नाही. म्हणून आज या विद्यापीठांना प्रामुख्याने बैठकीसाठी आमंत्रित करण्यात आले आहे असे आयुक्तांनी स्पष्ट केले.

३.	यानंतर सर्व विषयांवर सांगोपांग चर्चा झाली. चर्चेनंतर खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले :-

i)	सर्व डीम्ड् युनिव्हर्सिटी / प्रायव्हेट युनिव्हर्सिटी, पॉलीटेक्नीक, आयटीआय इत्यादि यांनी वरील विषयावर वर नमूद केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करावी. आवश्यक असेल त्याबाबत प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांनी सर्वांसाठी आदेश काढावेत.

ii)	उच्च व तंत्र शिक्षण विभागाने सर्व पारंपारीक विद्यापीठांचा आढावा घ्यावा व वरील निर्णयाप्रमाणे जलद गतीने काम करण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करावे.

------------